Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

शिवाजी महाराजांचे उदार धार्मिक धोरण

रविन्द्र मुन्द्रे

विभाग प्रमुख, इतिहास विभाग , श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला (महाराष्ट्र)

Abstract :-

शिवाजी महाराजांनी मराठा साम्राज्याची निर्मिती करताना सर्व धर्मियांच्या भावनांचा आदर केला. आपण हिंदू आहोत म्हणून फक्त हिंदूंनाच स्वराज्य स्थापनेत सहभागी करून घेतले नाहीत तर मुस्लिम व इतर जाती, धर्म, पंथीयांना सुद्धा स्वराज्य स्थापनेत सहभागाची संधी उपलब्ध करून दिली. महाराजांनी अंगीकारलेले उदार धार्मिक धोरण त्यांच्या साम्राज्य निर्मितीस सहाय्यक सिद्ध झाले. मूळातच त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांनी त्यांच्यावर केलेले धार्मिक संस्कार हे त्यांच्या उदार धार्मिक धोरणासाठी कारणीभूत ठरले. आपले उदार धार्मिक धोरण राबवितांना त्यांनी स्वधर्मात अनेक सुधारणा करण्याचासुद्धा प्रयत्न केला. म्हणूनच तत्कालीन सशक्त आरमाराची निर्मिती त्यांना करता आली. त्यांच्या धार्मिक धोरणाचा मुख्य उद्देश मराठा साम्राज्य निर्मितीत सर्वांचा सहभाग हाच होता.

Keywords :- शिवाजी महाराज, स्वराज्य, मराठा आरमार.

प्रस्तावना :-

शिवाजी महाराजांचा लढा हा कोणत्याही धर्माविरोधी नव्हता. त्यांना इतिहासकारांनी मुस्लिमद्वेष्टे ठरवून इतिहासाचा विपर्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांचा लढा येथील दुष्ट प्रवृत्ती, अन्याय आणि अत्याचाराबद्दल होता. त्यामुळे त्यांनी आपले धार्मिक धोरण उदार स्वरूपाचे अंगिकारले होते. त्यांच्या सुराज्यात धर्मस्वातंत्र्य असून प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे वागता येत होते. माणसाला माणूसकी शिकविणारा आणि माणसा-माणसात असलेले अंतर कमी करून मानवतेच्या नात्यात परिवर्तीत करणारा धर्मच असतो. त्यासाठी धर्माचा उपयोग सकारात्मक होणे आवश्यक आहे हे तेवढेच खरे. धर्माप्रमाणे आपल्या सुराज्यात प्रत्येकाने वागून राज्यात शांतता आणि सुव्यवस्था राखावी, असा उद्देश शिवाजी महाराजांचा होता. सर्व धर्मांना सोबत घेऊन जर चालले तरच स्वराज्य निर्मिती करणे सोपे जाईल ही जाणीव शिवाजी महाराजांना होती. त्याचप्रमाणे अकबर बादशहाचे उदाहरण सुद्धा शिवाजी महाराजांसमोर होते. शिवाजी महाराजांवर जिजाऊ कडून झालेले संस्कारसुद्धा त्यांच्या या उदार धार्मिक धोरणास कारणीभूत ठरतात.

मुसलमान सुलतानांनी हिंदूवर अत्याचार केले, म्हणून शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यात किंवा राज्याबाहेर मुसलमानांवर अत्याचार केले असे नाही. वास्तविक मुसलमानी अत्याचाराचा बदला मुसलमानांच्या कत्तली करून व त्यांच्या मशिदी पाडून त्यांना घेता आला असता आणि तसे त्यांनी केले असते तर त्यांना कोणाला फारसा दोष देता आला नसता. कारण त्या काळात सर्वत्रच सूडाचे राजकारण चालत असे. परंतु शिवाजी महाराज आपल्या काळाच्याही पुढे गेले होते. ते एक महान पुरूष होते. त्यांच्याठिकाणी अन्याय, अत्याचाराबद्दल चीड असली व ते अन्यायी राज्यकर्त्यांचा सूड घ्यायला सिद्ध झाले असले, तरी परधर्मातील निरपराध माणसांशी त्यांचे शत्रुत्व नव्हते. त्यांचे शत्रुत्व मुसलमानी राज्यकर्त्यांशी होते, मुसलमान लोकांशी नव्हते.

हिंदूवर फक्त आदिलशाही व मोगली सत्ताच अत्याचार करीत होत्या असे नाही, तर कोकण किनाऱ्यावरील सिद्दी व गोव्याचे पोर्तूगीज अशा धार्मिक अत्याचारामध्ये सामील होते. सिद्दी तर मराठ्यांचा हाडवैरी होता. अनेक वेळा तो कोकणातील प्रदेशांवर स्वारी करून ते प्रदेश उद्धवस्त करीत असे व अनेक निरपराध हिंदूंना ठार करीत असे अथवा बाटवून मुसलमान बनवित असे. सिद्दीचे सत्तास्थान जंजिरा किल्ला ताब्यात घेण्यासाठी व त्यायोगे सिद्दीची सत्ता नष्ट करण्यासाठी महाराजांनी सिद्दीवर अनेक मोहिमा काढल्याची नोंद इतिहासात आहे. त्याचप्रमाणे महाराजांनी पोर्तूगीजांच्या बाटवाबाटवीच्या उद्योगाचीही गंभीरपणे दखल घेतली होती.

शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन करून लोकांच्या जीवीताचेच नव्हे तर त्यांच्या धर्माचे व संस्कृतीचेही संरक्षण केले. हे करत असता, त्यांनी परधर्मियावर अत्याचार केले नाही किंवा त्यांना सूडानेही वागविले नाही. उलट त्यांचाही धर्म आपल्या धर्मासारखाच

थोर आहे, त्यांचाही धर्मग्रंथ आपल्या धर्मग्रंथासारखा पवित्र आहे, अशी त्यांची भावना होती. म्हणून मुस्लिम प्रजेलाही त्यांनी आपले मानले व अनेक मुस्लिमांनीही त्यांची निष्ठेने सेवा केली.

हिंदू धर्मशास्त्र विरोधी भूमिका

शिवाजी महाराज हे मानवतावादी होते. माणसामाणसात समता नांदेल, एकोपा राहून प्रत्येकजण बंधुभावाने वागतील असाच प्रयत्न त्यांनी आयुष्यभर केला म्हणूनच माणसाला विषमतावाद शिकवून माणसापासून दूर करणाऱ्या अनिष्ट धार्मिक रूढीरिवाजांचा त्यांनी धिक्कार केला. माणसामाणसांत जातीभेदाच्या भिंती उभारून व्यक्तीच्या विकासाला मारक ठरणाऱ्या प्रथांना त्यांनी विरोध करून धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक समता आणण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर स्वराज्याच्या आड येणाऱ्या कोणत्याही धर्माज्ञांची तमा बाळगली नाही. हिंदू धर्म सोडून दुसऱ्या एखाद्या धर्मात गेल्यावर पुन्हा त्यांना परत स्वतःच्या धर्मात प्रवेश मिळणार नाही, परधर्मात गेला म्हणजे नरकात गेला आणि नरकात गेलेल्याला पुन्हा धर्मात घेणे म्हणजे धर्मद्रोह! भयंकर पाप! शिवाजी महाराजांनी या धर्मबंधनाला तोडून एक नवा आदर्श निर्माण केला. त्यांनी बाटवून मुसलमान झालेल्या हिंदूंना शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेतले.

"बजाजी निंबाळकरास आदिलशाही राज्यकर्त्यांनी बाटवून मुसलमान केले होते. महाराजांनी त्यास शुद्ध करून हिंदू धर्मात आणले. एवढेच नव्हे तर त्याच्या मुलाला आपली मुलगी सुद्धा दिली. नेताजी पालकराने मोगली चाकरी स्वीकारल्यावर त्यास दक्षिणेस कैद करून मोगालांनी दिल्लीस नेले व सक्तीने मुसलमान केले, त्यास पश्चाताप होऊन तो महाराजांकडे आल्यावर महाराजांनी त्यास शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात आणले. बाजीप्रभू देशपांडे याचा पुत्र पिलाजी प्रभू यास सिद्दीने सक्तीने मुसलमान केले होते. महाराजांनी त्यास शुद्ध करून पुन्हा हिंदू धर्मात घेतले. रायजी नरसी देशकुलकर्णींचा मुलगा शामजी रायजी याला सुद्धा स्वधर्मात घेतले."[१] या सर्वांना आपल्या धर्मात घेऊन त्याच्याकडून स्वराज्यसेवा करवून घेतली.

सुरत लुटीहून परत येत असताना महाराजांना आपल्या वडिलांच्या मृत्युची दुःखद वार्ता ऐकावी लागली. महाराज त्वरेने रायगडावर आले. मातोश्री जिजाबाई सती जाण्याच्या विचारात होत्या. "तथापि महाराजांनी त्यांच्या गळा पडून असे न करण्याची शपथ घेतली. त्याउपरी मातुश्री जिजाबाई अग्निप्रवेश करीत होती. तिचे मांडीवर बैसून गळां मिठी घालून, आण घालून राहविली. आपला पुरूषार्थ पाहावयास कोणी नाही. तु जाऊ नको."[२] शिवाजी महाराजांनी शेवटी आपल्या मातोश्रीला सती जाण्यापासून परावृत्त केले. तत्कालीन ही बाब फार मोठी होती. सती जाण्याची प्रथा असताना किंवा ते धर्मबंधन असताना, शिवाजी महाराजांनी त्या बंधनांना झुगारून जिजाबाईला आपला पराक्रम पाहण्यासाठी सती जाण्यापासून परावृत्त केले. त्याकाळी ही भूमिका घेणे म्हणजे हिंदू धर्मशास्त्राला विरोधच होता.

महाराष्ट्राला इतरांच्या मानाने विपूल सागरी किनारा मिळाला परंतु एकदेशीय राजांनी सागरी सत्तेचा उपयोग करून घ्यावा अशी दृष्टी नव्हती. तसेच सागरी सत्तांशी सामना करण्याची महाराष्ट्राची अनुकूल परिस्थितीही नव्हती. फ्रेंच, डच, इंग्रज, पोर्तूगीज या परकीय शक्ती हळूहळू सागरावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हालचाल करीत होत्या. ह्या हालचाली स्वराज्यास पुढे महागात पडणार आहेत हे शिवाजी महाराजांच्या दूरदर्शी स्वभावाने ओळखले. त्यांच्या या दूरदर्शी स्वभावानेच भविष्यातील धोक्याची जाणीव त्यांना करून दिली. परंतु यावर उपाययोजना करण्यासाठी धर्म आडवा येत होता. धार्मिक विधिनिषेधाच्या कल्पनेमुळे महाराष्ट्रीयांना सागराकडे ओढ घेता आली नाही. कारण धर्माप्रमाणे सागर उल्लंघन म्हणजे धर्माज्ञेचा भंग! शिवाजी महाराजांनी या स्वराज्य घातकी रूढीचा प्रखर विरोध करून प्रबळ आरमार उभे केले. सागरी सत्ता सुद्धा आपल्या ताब्यात असावी आणि परकीयांनी सागरावर मिळविलेले वर्चस्व झुगारून देऊन त्यांच्या बरोबरीत यावे असा उद्देश आरमार निर्मिती मागे होता. मोगलांशी लढतांना जर जमिनीवर मराठा राज्य पराभूत झाले तर आपली सत्ता सागरावर टिकवून तेथून मोगलांना प्रतिकार करता आला पाहिजे हा सुद्धा उदात्त आणि दूरदर्शी उद्देश शिवाजी महाराजांचा होता. परकीयांनी सागरावर वर्चस्व निर्माण करून ते इतरांना कसे आपल्या धाकात ठेवत होते हे शिवाजी महाराजांनी पाहिले होते. आपण स्वराज्याची निर्मिती करताना ते सर्वांगीण विकसित असायला पाहिजे. जर स्वराज्याच्या निर्मितीत कोणतेही धर्मबंधन किंवा रूढी-परंपरा आल्या तरी त्यांना न जुमानता स्वराज्याचे स्वप्न साकार करणे हे ध्येय शिवाजी महाराजांचे असल्यामुळे त्यांनी धर्मशास्त्र विरोधी भूमिका घेऊन आरमाराची निर्मिती केली. आरमाराची निर्मितीच करून ते थांबले नाही तर त्याला विकसित करून परकीयांवर धाक निर्माण केला. पोर्तूगीज मराठा आरमाराला अक्षरशः घाबरत असत.

जातीभेद आणि अस्पृश्यता शिवकाळापूर्वी होती. शिवकाळात सुद्धा ती दिसून येते. परंतु शिवाजी महाराजांनी त्यावर घाव घालून नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांना स्पर्श करणे हा विटाळ समजला जाई. त्यांना सार्वजनिक आणि खाजगी ठिकाणी प्रवेश नव्हता, त्यामुळे अस्पृश्य असलेला मोठा समाज उपेक्षीत आणि दुःखी होता. शिवाजी महाराजांनी ही परिस्थिती पाहीली आणि अस्पृश्यता, स्पर्शास्पर्श, भेदाभेद मिटविण्याच्यादृष्टीने त्यांनी पाऊल उचलले. धर्मग्रंथामध्ये लढण्याचा अधिकार फक्त क्षत्रियांनाच देण्यात आला होता. राज्यातील शुद्र समाजाला मनुस्मृतीने शस्त्र धारण करण्याचा अधिकार, लढण्याचा अधिकार नाकारला होता. शूद्रांना वर्णव्यवस्थेनुसार फक्त इतर उच्चवर्णियांची सेवा करणे एवढाच अधिकार होता. त्यांच्यामध्ये पराक्रमी गुण असून सुद्धा त्यांना कोणतीही संधी दिली जात नसे. धर्मशास्त्र आणि धर्मग्रंथ हे पूर्णतः शूद्रांच्या विरोधी होते. त्यांच्या विकासाच्या सर्व वाटा या धर्मबंधनानी बंद केल्या होत्या. परंतु शिवाजी महाराजांनी आपल्या माणसाची पारख या गुणानुसार त्यांनी या शूद्रातील सर्व जाती-जमातींचा फायदा आपल्या स्वराज्यनिर्मितीसाठी करून घेतला. "रामोशी, भिल्ल, महार, मांग हे संरक्षण व्यवस्थेत होते."[३] कुणाचा धर्म, पंथ वा जात न पाहता, आपल्या स्वराज्याच्या फायद्यासाठी जो कोणी कामी येईल त्याला आपल्या कुवतीनुसार काम देऊन त्याच्याकडून ते करून घेतल्या जात असे. शिवाजी महाराजांनी धर्मशास्त्र विरोधी भूमिका घेऊन अस्पृश्यांना आपल्या सैन्यात सामील करून घेतले होते. तत्कालीन परिस्थिती

ही सामाजिक क्रांतीच होती. आपण करतो ते स्वराज्य हितासाठी करतो आहे. येथून अन्याय, अत्याचारी प्रवृत्तीचे राज्यकर्ते हाकलून लावायचे असतील आणि स्वराज्य निर्माण करावयाचे असेल तर सामाजिक समता निर्माण करणे आवश्यक आहे. जोपर्यंत आपण या सर्वांकडून कार्य करवून घेणार नाही तोपर्यंत त्यांच्यात राष्ट्रभावना जागृत होणार नाही. त्यांना सुद्धा राष्ट्रनिर्मितीत सहभागी करून घेऊन त्यांच्यावर स्वराज्यनिर्मितीचे कार्य सोपवून स्वराज्याचे उदात्त ध्येय साध्य करावे हा उद्देश शिवाजी महाराजांनी आपल्या या धोरणामागे ठेवला होता.

शिवाजी महाराजांनी इतर धर्मात गेलेल्या लोकांना शुद्ध करून आपल्या धर्मात घेतले. इतकेच नव्हे तर त्यांना आपले सोयरे सुद्धा बनविले व मानाचे स्थान समाजात मिळवून दिले. आरमाराची निर्मिती करून सागरावर सुद्धा आपले वर्चस्व निर्माण केले. अस्पृश्यांना किंवा शूद्रांना आपल्या सैनिक सेवेत सामावून घेतले. शिवाजी महाराजांचे हे कार्य म्हणजे धर्मशास्त्र आणि धर्मग्रंथ याविरूद्ध जाहीर बंड होते. त्यांनी आपल्या स्वराज्य निर्मितीच्या ध्येयात कुणीही आड आले तरी त्याची पर्व न करता त्याला बाजुला ठेऊन आपले कार्य पुढे नेले. जेव्हा वरील कार्य करताना धर्मबंधने आड येऊ लागले तेव्हा त्या धर्मबंधनाला न जुमानता आपले कार्य चालूच ठेवले. कारण त्यांनी जर धर्मावर आधारित आपले निर्णय घेतले असते तर कदाचित शिवाजी महाराजांचे स्वप्न साकार होऊ शकले नसते. धर्मात असणाऱ्या रूढी, रितीरिवाज, परंपरा यांना न जुमानता आपल्या स्वराज्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबी त्यांनी पूर्ण केल्या. शिवाय महाराजांनी परधर्मात गेलेले बजाजी निंबाळकर, नेताजी पालकर, पिलाजी देशपांडे व शामजी रायजी यांना शुद्ध करून पुन्हा आपल्या धर्मात आणले. त्यांच्या या कृतीने असेच म्हणता येणार नाही की, त्यांनी फक्त या चार लोकांना आपल्या सेवेत घेण्यासाठी किंवा त्यांच्या हातून राज्याची सेवा करून घेण्यासाठी त्यांना शुद्ध करून हिंदू धर्मात आणले. शिवाजी महाराजांनी ही कृती करण्यामागचा उद्देश म्हणजे हिंदू धर्मातील जाचक अशा प्रथा नाकारणे असा होता. परधर्मात गेलेल्या हिंदूला स्वधर्मात येण्यासाठी कोणताही विधी नव्हता. तेव्हा शिवाजी महाराजांनी हे धाडस करणे म्हणजे हिंदू धर्मशास्त्राविरोधी बंड पुकारणेच आहे. परंतु त्यांनी याचा अतिरेक कधीही केलेला दिसत नाही. हिंदू धर्मशास्त्राला ह्या बाबी योग्य वाटल्या परंतु शिवाजी महाराजांना आपल्या स्वराज्य निर्मितीसाठी त्या अनिष्ट वाटल्या म्हणून त्यांनी कुणाचेही न ऐकता आपले कार्य चालूच ठेवले. शिवाजी महाराजांनी हिंदू धर्मग्रंथाविरूद्ध उचललेले पाऊल हे हिंदू विरोधी नव्हते तर त्यांच्यात सुधारणा करणे हे होते.

मशीद व कबर स्थापन करून त्या संरक्षित केल्या :-

माणसाला जीवन जगण्यासाठी जशा अनेक साधनांची गरज असते त्यापैकी धर्म सुद्धा त्याने आपल्या जीवनातील एक साधन बनवून घेतले आहे. मुस्लिमांमध्ये ही बाब आपल्याला प्रकर्षाने दिसून येते. मुस्लिमांची धर्मावर आणि त्यात असणाऱ्या साधनांवर अगाध श्रद्धा आहे. हिंदू ज्याप्रमाणे आपल्या श्रद्धा मंदिरात जाऊन अर्पण करतात त्याचप्रमाणे मुस्लिम मशीदीमध्ये आपल्या श्रद्धा अर्पण करतात. इस्लाम धर्मात मशीदीकडे पवित्र स्थान म्हणून पाहल्या जाते. सर्व धार्मिक कार्याची सुरूवात मशीदी मधूनच केली जाते.

शिवाजी महाराजांच्या उदार धार्मिक धोरणाचा मशीदी आणि कबर बांधणे हा एक भाग होता. स्वराज्यात जर सर्व धर्मांना स्वातंत्र्य दिल्या गेले आहे तर त्यांच्या धार्मिक भावनांची जाणीव ठेवणे हे सुद्धा राज्यकर्त्यांसाठी आवश्यक असते. जो राजा आपल्या प्रजेच्या धार्मिक भावनांचा आदर करतो, तो आपले राज्य सुरळीतपणे अनेक वर्ष चालवितो. अकबर बादशहाच्या उदाहरणावरून आपल्याला याची जाणीव होते. शिवाजी महाराजांनी सुद्धा आपल्या मुस्लिम प्रजेसाठी धार्मिक अनेक सोयी, सवलती निर्माण केल्या होत्या. मुस्लिमांना आपल्या सैन्यात सामावून घेतांना त्यांनी जसा धर्म आड येऊ दिला नाही. त्याचप्रमाणे त्यांच्या धार्मिक भावनांच्या आड कधी महाराज आले नाही. ज्याप्रकारे हिंदूना सवलती होत्या त्याचप्रकारे मुस्लिमांना सुद्धा दिल्या गेल्या.

शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण एवढे स्पष्ट व नि:पक्षपाती होते की, कुठल्याही व्यक्तीने या बाबतीत त्यांचा आदर्श घ्यावा. त्या काळात हिंदू धर्मातील संताबरोबरच मुस्लिम धर्मातही संत होते. शिवाजी महाराज या दोन्ही धर्मातील संताचा आदर करी. त्यांना कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, यांची ते काळजी घेई. "त्यांनी फक्त वेदोनारायण जोतीष्यांना किंवा तपस्वी साधू संतानाच निवृत्तीवेतने दिली नाहीत, तर इस्लामी, बैरागी, साधू, उरवली यांना आपल्या खर्चाने मठ बांधून दिले. त्यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केली."[४] आपल्या राज्यातील मुस्लिम प्रजा धार्मिक संतुष्ट राहावी म्हणून शिवाजी महाराजांनी त्यांच्यासाठी अनेक उपाययोजना केल्या. "मुलखात देव देवस्थाने जागोजागी होती. त्यास दिवा बत्ती, नैवेद्य, अभिषेक स्थान पाहून (महाराजांनी) यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मशीदी त्यांची दिवाबत्ती, स्थान पाहून चालविले."[५] शिवाजी महाराजांच्या या धार्मिक धोरणाची सुरूवात १६५९ सालीच जाहिरपणे सुरू झालेली दिसते. अफजलखान वधानंतर महाराजांनी वाई-सातारा-कोल्हापूर हा प्रदेश जिंकून स्वराज्यात आणला. त्यावेळी त्यांनी नव्यानेच जिंकलेल्या प्रदेशातील लोकांसाठी एक जाहिरनामा काढला. त्यामध्ये असे म्हटले होते की, "आदिलशाही राज्यात मुसलमानांच्या धर्मस्थानांना जी इनामे चालू होती, ती सर्व नव्या राज्याच्या अंमलातही चालू राहतील, धर्मस्थानांना कोणताही उपसर्ग होणार नाही."[६] इतकेच नव्हे तर "मुस्लिम संत आणि मुस्लिम देवस्थानांना जमिनी इनाम देऊन त्यांच्या निर्वाहाची व्यवस्था शासकीय खर्चातून केली."[७]

रायगडावर राज्यभिषेकाच्या तयारीसाठी अनेक नवीन इमारती बांधल्या जात होत्या. बरेचसे बांधकाम पूर्ण झाले तेव्हा महाराज मोरोपंत त्रिंबक पिंगळे, स्वराज्याचे प्रधान यांच्यासोबत पाहणीकरिता गेले. सर्व पाहणी करून ते म्हणाले, "तुम्ही जगदीश्वराचे मंदिर बांधले, चांगले केले, पण माझ्या मुस्लिम प्रजेसाठी मसजिद कोठे आहे? यावर पिंगळे काय बोलणार? लागलीच महाराजांनी आज्ञा दिली की, माझ्या मुस्लिम प्रजेसाठी मसजिद बांधा अन तिही माझ्या महालासमोर बांधा त्यानुसार पिंगळ्यांनी महाराजांची आज्ञा शिरसावंद्य मानून रायगडावर महाराजांच्या महालासमोर मशीद बांधली."[८] शिवाजी महाराजांच्या अशा जिव्हाळ्याच्या आणि स्वतंत्र बुद्धीने वागण्यामुळेच मुस्लिम प्रजासुद्धा आपला जीव शिवाजीसाठी धोक्यात घालण्याला मागे कचरत नसत. जो आपल्या संरक्षणाची, संवर्धनाची आणि

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

विकासाची, ते मग आर्थिक असो की धार्मिक, हमी घेत असेल आणि तशा प्रकारे कृती करीत असेल तर निश्चित आपण त्याच्यासाठी बलिदान द्यायला पाहिजे अशी भावना शिवाजी महाराजांच्या उदार धार्मिक धोरणाने मुस्लिम प्रजेमध्ये झाली होती. शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण हे त्याच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात सिंहाचा वाटा उचलून जाते असे म्हणावयास हरकत नाही.

शिवाजी महाराजांनी आपल्या मुस्लिम प्रजेच्या धार्मिक भावनांचा जसा आदर केला तसाच आपल्यावर कठीण प्रसंगात साथ देणाऱ्या योद्ध्यांची आठवण ठेवण्यास ते विसरले नाही. जीवाची पर्वा न करता शिवरायांसाठी आग्राभेटीच्या वेळी आपले प्राण संकटात घालून महाराजांच्या सुटकेच्या नाट्यमय प्रसंगात मदत करणारा मदारी मेहतर या आपल्या मुस्लिम सेवकास महाराज कधीच विसरले नाहीत. या निष्ठावंत मुस्लिम सेवकास महाराजांनी आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान दिले आहे. जिवंतपणी त्याला काही कमी केले नाही आणि मृत्युनंतरही त्याचे विस्मरण होऊ दिले नाही. मदारी मेहतरच्या मृत्युनंतर शिवाजी महाराजांनी त्याची कबर रायगडावर बांधली, त्यात त्याला विधिवत महाराजांनी दफन केले. या संदर्भात श्री. आवळसकर शककर्ता शिवाजीतील पृ. २२३ चा आधार देऊन म्हणतात. "रायगडावर महादरवाजापासून पाऊण मैलाच्या वाटचालीनंतर रायगडाच्या अत्युच्च जागी आपण पोहचतो. त्या आरंभी लागणारी कबर ज्याने शिवाजीचे आग्ग्रास प्राण वाचविले, त्या शिवाजीच्या शय्यागारातील सेवक फरास मदारशहा याची होय."[९]

जीवावर उदार होऊन जीव वाचविणाऱ्या सेवकास महाराज जसे विसरले नाहीत तसेच जीवावर उदार होऊन जीव घेण्यास आलेल्या अफजलखानासही महाराज विसरले नाहीत. राजकीय विरोधक म्हणून अफजलखानास मारावे लागले हे खरे आहे. परंतु तो मुस्लिम होता म्हणून त्याला मारले असे कुणी म्हणेल तर ते मुर्खपणाचे ठरेल. "अफजलखानास मारल्यावर त्याचे मुस्लिम धर्मरिवाजाप्रमाणे महाराजांनी दफन केले आणि प्रतापगडावर त्याची कबर बांधून खर्चासाठी वार्षिक उत्पन्नही लावून दिले."[१०]

शिवाजी महाराजांच्या अशा अनेक उदाहरणावरून खाफीखान सारख्या लेखकाला सुद्धा महाराजांचा गुणगौरव केल्याशिवाय राहवत नाही. "मोहिमेत हाती आलेल्या कोणत्याही स्त्रिच्या अब्रूस त्याने कधीही धक्का लागू दिला नाही. याबाबत त्याचे हुकूम इतके सक्त होते की, ते मोडणाऱ्यांना जबर शिक्षा दिल्यावाचून ते राहत नसे. त्याने आपल्या सैनिकांना सक्त आदेश दिले की, मोहिमेत मशिदीला अजिबात धक्का लागता कामा नये. कुठल्याही धर्माच्या स्त्रीस तोबीस होता कामा नये. एखादी कुराणाची प्रत सापडली तरी ती सन्मानपूर्वक एखाद्या सैनिकास दिली जाई."[११]

शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीत मुस्लिमांसाठी मशिद आणि त्यांच्या स्मरणार्थ कबरी बांधून ठेवल्या. त्यांच्या उच्च वैचारिक पातळीचा जेव्हा विचार केल्या जातो तेव्हा महाराजांची गणना असामान्य लोकांमध्ये करावी लागते. आपल्याला कठीण प्रसंगी बहुमोल मदत करणाऱ्या मदारी मेहतराला महाराज कधीच विसरू शकणार नव्हते. परंतु स्वतःचा जीव घ्यायला आलेल्या अफजलखानास सुद्धा महाराज विसरू शकले नाही. अफजलखानाच्या वीरमरणाची कदर करणारे शिवाजी महाराज असामान्यच म्हणायला पाहिजे. अफजलखानाला जर फक्त मुस्लिम म्हणून शिवाजी महाराजांनी मारले असते तर कदाचित महाराजांवर दोषारोपण करण्यास जागा होती. परंतु त्यांनी अफजलखानाला मारून जो जरब संबंध प्रदेशात बसविला होता की, ज्यामुळे संपूर्ण आदिलशाही घाबरून गेली होती. त्यामुळे महाराजांना आपले समोरील कार्य करणे सुकर गेले. अफजलखानाकडे शिवाजी महाराज फक्त राजकीय विरोधक म्हणून पाहात होते. आपल्या स्वराज्य स्थापनेच्या आड कुणीही आला तरी त्याची गय महाराजांनी कधी केली नाही. मग तो हिंदू सुभेदार असो कि मुस्लिम जहागीरदार असो.

शिवाजी महाराजांनी मशिदी आणि कबरी बांधल्याच नाही तर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी सुद्धा घेतली. त्यांच्या संवर्धनासाठी इनाम, देणगी दिलेल्या इतिहासात आढळून येतात.

मुस्लिम संत बाबा याकुत व शिवाजी महाराज

शिवाजी महाराजांच्या ठिकाणी साधुसंताविषयी नितांत श्रद्धा व भक्ती होती. मातोश्री जिजाबाई सत्वशील, धार्मिक व श्रद्धाळू असल्याने त्यांनी धर्म व साधुसंत यांच्याविषयीचे पवित्र संस्कार बाल शिवाजीच्या मनावर केले असणे, अगदी स्वाभाविक आहे. धर्म, देवदेवता, धर्मग्रंथ व साधुसंत याविषयीचा परम आदर हा महाराजांच्या चरित्राचा एक आगळा असा पैलू आहे. स्वराज्याची स्थापना हे महाराजांचे जीवित कार्य होते. त्यासाठी स्वराज्यातील सर्व साधुसंतांना आदराने वागवून महाराजांनी आपली उदार भावना त्यांच्या प्रती निष्ठेची ठेवली. धार्मिक क्षेत्रात संतांनी चालविलेली चळवळ महाराजांनी सुरू केलेल्या स्वराज्य संपादनाच्या चळवळीस येऊन मिळाली व त्यामुळे स्वराज्याच्या निर्मितीस गती आली. अशाच संतमालिकेत एक नाव म्हणजे बाबा याकुत.

बाबा याकुत हे मुस्लिम संत शिवाजी महाराजांचे गुरू होते. बाबा याकुत हे रत्नागिरी जिल्ह्यातील समुद्रतीरावर बाणकोटच्या खाडीशी असलेल्या केळशी या गावाचे होते. "शिवराय महत्त्वाच्या कार्यास जातांना त्यांचा सल्ला घेत असत."[१२]

"छत्रपती शिवाजी महाराजांनी हजरत पीर सय्यदबाबा याकुत यांच्या दर्ग्याला उद, फुले व फकीरांची बिदागी वगैरे बाबींवर खर्च करण्याकरिता उंटबर केळशी या गावातील ६५३ एकर जमीन आज्ञापत्राने इनाम दिली आहे. हे आज्ञापत्र बारनिशी बुक नं. ५, तालुका सुवर्णदूर्ग यातील नंबर ३२६ वर नोंद आहे. शिवाजी महाराजांनी त्यांच्या दर्ग्याच्या बांधकामाला सुरूवात केली. इमारतीच्या पायाचे बांधकाम चालू असताना शिवाजी महाराजांचा अकाली मृत्यु झाला. त्यामुळे दर्ग्याच्या भिंतींचे काम अपूर्ण राहिले. नंतर संभाजीने त्या कामाला सुरूवात करून भिंतीचे काम घुमटापर्यंत नेण्यापूर्वीच संभाजीचाही अंत झाला."[१३]

"बाबा याकुत हिजरी सन १०९३ च्या शाबान महिन्याच्या सहा तारखेस केळशी येथे पैगंबरवासी झाले. हिजरी, सन १०९३ म्हणजेच १६८१ होय. म्हणजेच छत्रपती शिवाजींच्या मृत्युनंतर एक वर्षाने बाबा याकुत पैगंबरवासी झाले. शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या पण अपुऱ्या राहिलेल्या दर्ग्यामध्ये त्यांना विधिपूर्वक दफन करण्यात आले."[१४]

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

शिवाजी महाराजाच्या गुरूंची वीस जणांची यादी आहे. त्यात बाबा याकुत सुद्धा आहे. म्हणजेच महाराज हिंदू संतांचा जसा आदर करीत होते त्याचप्रमाणे मुस्लिम संताचा सुद्धा आदर करीत होते. आपल्या सैन्यातच त्यांनी मुस्लिमांना स्थान दिले नाही तर गुरूस्थानी बसविले होते. शिवाजी महाराजांचा या गुरूंवर इतका विश्वास होता की अनेक महत्त्वाच्या कामासाठी जाताना त्या विषयावर ते बाबा याकुत यांच्याशी सल्लामसलत करीत असत. बाबा याकुत हे जरी मुस्लिम संत होते तरी त्यांना परधर्माची भावना कधी शिवली सुद्धा नाही. बाबा याकुत हे सुद्धा आपल्या शिष्याला योग्य असे मार्गदर्शन करीत होते. अन्यायी अत्याचारी मुस्लिम शासक ते जरी आपल्या धर्माचे असले तरी मात्र स्वराज्यासाठी घातक आहेत. म्हणून शिवाजी महाराजांना सल्ला देण्याचे काम बाबा याकुत करीत असत. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीत ज्या अनेक लोकांचा सहभाग आहेत त्यात बाबा याकुत सुद्धा आपली हजेरी लावून जातात.

निष्कर्ष :-

शिवाजी महाराजांचे उदार धार्मिक धोरण म्हणजे स्वराज्य निर्मितीसाठी आणि सुराज्य बनविण्यासाठी उचललेले सुयोग्य असे पाऊल होते. सर्व धर्म, पंथ, जाती यांना जोपर्यंत राज्यकर्ता सोबत घेऊन चालणार नाही तोपर्यंत साम्राज्यात शांती आणि समृद्धी नांदणार नाही. ही बाब शिवाजी महाराज जाणून होते म्हणून त्यांनी आपले धार्मिक धोरण उदार स्वरूपाचे ठेवले होते. धर्मांना स्वातंत्र्य देतांना त्यांनी ही सुद्धा काळजी बाळगली होती की, स्वातंत्र्याचा अतिरेक होता कामा नये. धार्मिक स्वातंत्र्यापासून जर अनाचार माजत असेल तर त्यात लगेच सुधारणा सुद्धा महाराजांनी घडवून आणल्या होत्या.

मराठ्यांचा आद्य ग्रंथकार ग्रँट डफ यानेही महाराजांच्या धार्मिक धोरणाचे कौतूक केले आहे. तो म्हणतो, "मुसलमान राज्यकर्त्यांनी कबरी, मशिदी व पीर यांना दिलेली इनामे शिवाजीने कधीही बंद केली नाहीत."[१५] डॉ. डेलॉनसारख्या युरोपियन प्रवाशाने महाराजांच्या या धोरणाचे कौतूक केले आहे. तो लिहितो की, "शिवाजी सर्व धर्माशी सहिष्णुतेने वागतो आणि पश्चिमेकडील तो एक अत्यंत हुशार व जाणता राजा समजला जातो."[१६]

शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचे कौतूक परकीयांनी करणे म्हणजे महाराजांचे धार्मिक धोरण हे उच्च दर्जाचे होते. धार्मिक सहिष्णुता महाराजांनी ठेवली म्हणूनच त्यांच्या स्वराज्याच्या ध्येयपूर्तीत मुस्लिमांनी तन-मन-धनाने आपले योगदान दिले.

संदर्भ :-

१) बाळशास्त्री, हरिदास, ***पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराज***, भाग ४, काळ प्रकाशन, पुणे, १९६०, पृ. १०२.
२) वाकसकर, वि.स. (संपा.), ***मंत्री दत्ताजी त्रिमल वाकेनवीस विरचीत शिवछत्रपतीची ९१ कलमी बखर***, श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई, १९३०, पृ. २७.
३) Mahale, K.L., ***Shivaji - The Pragmastist***, Vishnu Bharati Publication, Nagpur, 1969, p.no. 122.
४) Sarkar, Jadunath, ***Shivaji and His Times***, Orient Longman Ltd., Bombay, 1952, p.no. 474.
५) वाकसकर, वि.स. (संपा.), ***पूर्वोक्त***, पृ. ३०.
६) पवार, डॉ. जयसिंगराव, ***मराठी सत्तेचा उदय***, सी. जमनादास आणि कं., १९८८, पृ. ३४३.
७) Sen, Surendranath, ***The Military System of the Marath's***, Orient Longman Pvt.Ltd., Culcutta, 1958, p.no. 18.
८) Sardesai, G.S., ***New History of Maratha's***, Phoenix Publication, Bombay, 1948, p.no. 264-265.
९) हनवते, प्रेम, ***शिवरायांचे निष्ठावंत मुस्लिम सैनिक***, सुधीर प्रकाशन, वर्धा, १९९४, पृ. ३३.
१०) ***तत्रैव***, पृ. ३३.
११) Pagadi, Setu Madhavrao, ***Chatrapati Shivaji***, Continental Publication, Pune, 1974, p.no. 39.
१२) Sardesai, G.S., ***पूर्वोक्त***, पृ. २६४.
१३) हनवते, प्रेम, ***पूर्वोक्त***, पृ. २६४.
१४) ॲड. शेख यांच्या '***हजरत पीर सैय्यद बाबा याकुत सखरी***' या अप्रकाशित पुस्तकातून.
१५) डफ, ग्राण्ट (ले), मालवीय, लक्ष्मीकांत (अनु.), ***मराठो का इतिहास***, महामना प्रकाशन मन्दिर, इलाहाबाद, १९७२, पृ. १५५.
१६) पवार, डॉ. जयसिंगराव, ***पूर्वोक्त***, पृ. ३४३.